**महाराष्ट्र शासन**
**जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी, जि.रत्नागिरी**
**(पुरवठा शाखा)**

---

**दुरध्वनी क्र.(०२३५२)२२२४१२** **ई-मेल**-dso_ratnagiri@rediffmail.com
क्र.पुरवठा-१/ग्रा.सं.जि.ग्रा.सं.प./२०१७ दिनांक ०२/११/२०१७

## रत्नागिरी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याकरिता अर्ज मागविण्यासाठी जाहिरात

ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ च्या कलम ७ व ८ नुसार ग्राहकांच्या अधिकारांचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी जिल्हा स्तरावर ग्राहक संरक्षण परिषद गठीत करणेची आहे. यापूर्वी क्रमांक पुरवठा/एस.बी.१/जिग्राप/५/२०१४ दिनांक ३०/०८/२०१४ चे आदेशाने गठीत केलेल्या ग्राहक संरक्षण परिषदेचा ३ वर्षाचा कार्यकाल दिनांक ३०/०८/२०१७ रोजी पूर्ण झाल्याने सदर समितीची मुदत संपुष्टात आली आहे. त्यामुळे या समितीमधील प्रवर्गनिहाय सर्व अशासकीय सदस्यांचे सदस्यत्व समाप्त झाले असल्याने पुढील ३ वर्षाचे कालावधीसाठी नव्याने अशासकीय सदस्य निवड करण्यासाठी प्रवर्गनिहाय जाहिरात दिनांक २७/०९/२०१७ रोजी दैनिक तरुण भारत मध्ये प्रसिध्द करण्यांत आली होती. परंतु अर्ज मागविण्याची मुदत आता संपलेली असून अशासकीय सदस्यांच्या निवडीसाठी प्रवर्गनिहाय पुरेसे अर्ज प्राप्त झालेले नाहीत. निवड करावयाचे प्रवर्ग निहाय अशासकीय सदस्यांची संख्या, निकष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | प्रवर्ग | संख्या | निकष |
|---|---|---|---|
| १ | अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी | १० | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णय क्र.ग्राराप-१०१३/प्र.क्र.११९/ग्रासं-२, दिनांक १९ ऑक्टोबर, २०१३ चे अवलोकन करावे. |
| २ | जिल्हा परिषद सदस्य | ०२ | |
| ३ | नगर परिषदांचे सदस्य | ०२ | |
| ४ | पंचायत समिती सदस्य | ०२ | |
| ५ | कृषि उत्पन्न बाजार समिती सदस्य | ०२ | |
| ६ | शाळा/महाविद्यालयाचे | ०२ | |
| ७ | वैद्यक व्यवसाय | ०२ | |
| ८ | व्यापार व उद्योग क्षेत्र | ०२ | |
| ९ | पेट्रोल व गॅस विक्रेत्यांचे | ०२ | |
| १० | शेतकरी प्रतिनिधी | ०२ | |
| | **एकूण** | २८ | |

**अ)** सदर जाहिरात, याबाबतचे शासन निर्णय, परिशिष्ट **'अ'** मधील अर्जाचा विहीत नमुना, परिशिष्ट **'ब'** मधील सोबत जोडावयाचे कागदपत्रांची सूची या सर्व बाबी जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे www.ratnagiri.nic.in संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यांत आल्या आहेत. त्यामुळे अर्जाचा नमुना सदर संकेतस्थळावरुन उपलब्ध होईल किंवा जिल्हाधिकारी कार्यालय (पुरवठा शाखा) रत्नागिरी यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.

**ब)** इच्छुक **संस्था**/पदाधिकारी, व्यक्ती यांनी अर्ज दाखल करण्यापूर्वी याबाबतचे शासन निर्णय, अधिसूचना **वा तत्संबंधीचे सर्व** सूचना पत्रांचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

**क)** याप्रमाणे जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्य म्हणून काम करण्यास इच्छुक असणारे संस्था/पदाधिकारी, व्यक्ती यांनी परिशिष्ट **'अ'** मधील विहीत नमुन्यांत परिशिष्ट **'ब'** मध्ये दिलेल्या कागदपत्रांचे साक्षांकित केलेल्या सत्यप्रतिसह आपले लेखी अर्ज ही जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत दाखल होतील अशा वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय (पुरवठा शाखा) रत्नागिरी येथे दाखल करावेत. मुदतीनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

२.११.१८.

**जिल्हा पुरवठा अधिकारी**
**रत्नागिरी**